महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र पशूधनविकास मंडळ
विभागीय व्यवस्थापक शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र कार्यालय
नागपुर युनिव्हर्सिटी कॅम्पस समोर
अमरावती रोड नागपूर-४४००३३
Email - rmfslnagpur@gmail.com

---

## जाहीर लिलाव सुचना नियम व अटी

शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र, अमरावती रोड, नागपुर येथील खालील प्रमाणे निकाली काढावयाच्या पैदासी वळुंची जाहीर लिलावाव्दारे विक्री दिनांक:- 11/03/2026 रोजी दुपारी 12.00 वाजतापासुन करावयाची आहे.

| अक्र | जनावरांचा प्रकार/जात | वळु क्रमांक | एकुण |
|---|---|---|---|
| 1 | जर्सी संकरीत 50 % | 913,1017,1019 | 03 |
| 2 | साहीवाल 100% | 957,1049,981,1005,1013 | 05 |
| 3 | गीर 100% | 941,991 | 02 |
| 4 | हरीयाणा 100% | 933 | 01 |
| 5 | राठी100% | 1041 | 01 |
| 6 | मु-हा100% | 265 | 01 |
| | एकूण | | 13 |

**निकाली काढावयाच्या पैदासी वळुंच्या जाहीर लिलावाच्या नियम व अटी**

1) लिलावात भाग घेवु इच्छिणा-यांना अनामत रोख रक्कम रु. 1000/- (अक्षरी रुपये एक हजार) लिलाव होण्यापुर्वीच कार्यालयात जमा करावी लागेल.त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. सदर अनामत रक्कम अयशस्वी लिलाव धारकास लिलाव पुर्ण होताच परत करण्यात येईल.

2) यशस्वी लिलाव धारकास लिलावाची पुर्ण रक्कम भरल्यानंतर अनामत रक्कम परत करण्यात येईल. अथवा जनावरांच्या लिलाव किंमतीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

3) लिलावात भाग घेणा-यांनी शेतकरी/ गोपालक असल्याचा पुरावा जमिनीचा 7/12 दाखला / दुग्ध व्यवसाय करीत असल्याचा दाखला आणि आधारकार्ड ची प्रत आणणे आवश्यक आहे.

4) लिलावातील जनावरे लिलावात भाग घेणा-यांनी अगोदर पुर्ण पाहुन घ्यावीत नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

धारकाच्या नावावर तीन वेळा पुकारा करुन लिलाव सोडण्यात येईल. लिलावात तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

6) लिलावाची बोली रु. 500/- च्या (रुपये पाचशे फ़क्त ) पटीत राहील.

7) लिलावास अंतीम मंजुरी देणे , लिलाव नाकारणे अथवा लिलाव प्रक्रीयेस स्थगिती देणे याचा संपुर्ण अधिकार लिलाव समितीने राखुन ठेवला आहे. समितीचा निर्णय लिलावात भाग घेणा-यांवर बंधनकारक राहील. लिलावात होणा-या कोणत्याही वादात लिलाव समिती अध्यक्षांचा निर्णय अंतीम राहील व तो सर्वांना बंधनकारक राहील

8) क्रमांक 01 च्या बोली धारकाने पैसे न भरल्यास क्रमांक 02 च्या बोलीधारकाची बोली ग्राहय धरण्यात येवुन वळु देण्यात येईल. व क्रमांक 01 च्या बोली धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

9) लिलावातील ज़नावरे जिथे आहे व जसे आहेत त्या स्थितीत लिलाव करण्यात येईल.

10) लिलाव ज्या व्यक्तीच्या नावे सोडण्यात येईल त्या व्यक्तीने जनावराची संपुर्ण रक्कम लिलाव झाल्यानंतर त्याच दिवशी भरुन दोन दिवसाचे आत जनावर घेवुन जावे लागेल. अन्यथा त्यानंतर रुपये 300/- प्रतिदिन प्रति जनावर शुल्क आकारण्यात येईल. जनावर तीन दिवसाच्या आत घेवुन न गेल्यास संबंधीताची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचे जनावर नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तीस देण्यात येईल सदर जनावरांची रक्कम क्र. 01 बोलीधारकाच्या बोली प्रमाणे भरावी लागेल.

11) सदर अटीचे उल्लंघन करणा-यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्या व्यक्तीस पुढील लिलावात भाग घेता येणार नाही. तसेच त्या जनावरावर हक्क सांगता येणार नाही. लिलाव समिती लगेच फेर लिलाव करण्यास मुक्त राहील.

12) एकदा विकलेले जनावर कोणत्याही सबबीवर परत घेतले जाणार नाही. भरलेली रक्कम परत मिळणार नाही. लिलाव झालेल्या जनावरांची रक्कम भरणा झाल्यानंतर कुठलीही जबाबदारी शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्राची राहणार नाही. त्याची संपुर्ण जबाबदारी खरेदीधारकाची/ लिलावधारकाची राहील.

13) लिलावात घेतलेली जनावरे स्वत:च्या वाहनाने वाहतुक करुन घेवुन जाणे बंधनकारक राहील.

14) पशुपालकांनी / गोपालकांनी लिलावात घेतलेले वळु शेतीकामाकरीता अथवा गाई /म्हशी नैसर्गिक संयोगाव्दारे फळविण्याकरीता वापरण्यात यावीत त्यासंबंधाने रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

15) कोणतेही कारण न दाखविता लिलाव समिती अध्यक्षास लिलाव रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहे.

विभागीय व्यवस्थापक
शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र
नागपुर,
तथा,अध्यक्षा लिलाव समिती

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र पशूधन विकास मंडळ
विभागीय व्यवस्थापक शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र कार्यालय
नागपुर युनिव्हर्ससिटी कॅम्पस समोर
अमरावती रोड नागपूर-४४००३३
Email – rmfslnagpur@gmail.com

---

जा.क्र.-वि. व्य/शा.गो रे.नि.के/पशुधन/ ४७७-९५/२०२५,नागपुर,दि.२६/०२/२०२६

# जाहीर लिलाव सुचना

**विषय** :- शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र, नागपुर येथील विक्री करीता उपलब्ध वळु खरेदीसाठी लिलावास उपस्थित राहणेबाबत..

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, विभागीय व्यवस्थापक, शासकीत गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र, अमरावती रोड, नागपूर या संस्थेतील खालील प्रमाणे पैदासी वळु शेतीकामाकरीता जाहीर लिलावाव्दारे विक्री करावयाचे आहेत.

| अक्र | जनावरांचा प्रकार/जात | वळु क्रमांक | एकुण |
|---|---|---|---|
| 1 | जर्सी संकरीत 50 % | 913,1017,1019 | 03 |
| 2 | साहीवाल 100% | 957,1049,981,1005,1013 | 05 |
| 3 | गीर 100% | 991,941 | 02 |
| 4 | हरीयाणा 100% | 933 | 01 |
| 5 | राठी100% | 1041 | 01 |
| 6 | मु-हा100% | 265 | 01 |
| | | एकूण | 13 |

जाहीर लिलावाच्या नियम व अटी

1) जनावरांचा जाहीर लिलाव दिनांक 11/03/2026 रोजी दुपारी ठीक 12.00 वाजल्यापासुन सुरु होईल .
2) लिलावधारकाने लिलावात भाग घेण्याकरीता शेतीचा 7/12 उतारा / दुग्ध व्यवसाय करीत असल्याचा दाखला तसेच आधारकार्ड सोबत आणणे आवश्यक आहे.
3) लिलावात भाग घेण्यासाठी लिलावधारकाने कार्यालयात रोख रु. 1000/- अनामत रक्कम म्हणुन ठेवणे आवश्यक आहे.
4) सदरची अनामत रक्कम लिलाव धारकास लिलाव अयशस्वी झाल्यास परत करण्यात येईल.
5) लिलावाची बोली ही रु. 500/- च्या पटीत राहील.
6) लिलावात भाग घेण्यासाठी लिलाव समितीने ठरवुन दिलेल्या अटी क्र. 1 ते 15 मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन देणे बंधनकारक आहे.
7) उर्वरीत जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहावयास मिळतील. तरी गरजु व ईच्छुक पशुपालकांनी / गोपालकांनी सदर वळु खरेदी करण्याबाबत जाहीर लिलावास दिनांक 11/03/2026 रोजी दुपारी 12.00 वाजता पासुन कार्यालयात उपस्थित राहावे.

विभागीय व्यवस्थापक
शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र नागपुर

प्रतिलिपी:-

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपुर यांना माहितीकरीता सविनय सादर
2. .मा. प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय नागपूर विभाग नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर
3. मा. प्रादेशिक सहआयुक्त, पशुसं वर्धन व दुग्धव्यवसाय अमरावती विभाग अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर
4. जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,भंडारा,गोंदिया,वर्धा,नागपूर,चंद्रपुर, गडचिरोली, अमरावती यांना सुचना फलकावर लावण्याकरिता सस्नेह अग्रेषित.
5. व्यवस्थापक, शासकीय पशू पैदास प्रक्षेत्र , नागपूर
6. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र ,नागपुर.
7. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, पशुवैधकीय सर्वचिकीत्सालय, नागपुर.
8. अधिक्षक शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र ,नागपुर.